**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत घटकांखालील उपघटक/बाबींच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कामांच्या विषयांचा समावेश करणेबाबत तसेच, प्रकल्प अंमलबजावणीच्या अनुषंगाने ग्राम कृषि विकास समितीच्या कार्यकक्षेत वाढ करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-कृवपदुम-१९०४६/७/२०२६-MAG-८A(E-१५३६१२२)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०३ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ :-**

१. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र. ८१/८-अे, दि.०९.०९.२०२०
२. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ-४६२२/प्र.क्र. ९४/८-अे, दि.३०.६.२०२३
३. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ-४६२४/प्र.क्र.८२/८- अे, दि. ०३.०९.२०२४
४. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ-४६२२/प्र.क्र. ९४/८-अे, दि.१४.१०.२०२४
५. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG- ८A (E-११६८०५०), दि.०८.०७.२०२५
६. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०४६/१३/२०२५- MAG-८A (E-१२०७१४५), दि. ०५.०८.२०२५

**प्रस्तावना: -**

१. कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ३० जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशीव, लातूर, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा, वर्धा, जळगाव व नाशिक या २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु.६००० कोटी (अक्षरी रुपये सहा हजार कोटी) किंमतीचा जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. कृषि व पदुम विभागाच्या दिनांक १४.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये वरील २१ जिल्ह्यांमधील ७२०१ गावांचा प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये समावेश करण्यात आला आहे. कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ०८.०७.२०२५ च्या शासन निर्णयान्वये, २१ जिल्ह्यांतील निवड केलेल्या ७२०१ गावांमध्ये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्यास तसेच, जागतिक बँकेसोबत प्रकल्प करार व कर्ज करार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जागतिक बँक, केंद्र शासन व राज्य शासन यांचे समवेत प्रकल्प करार व कर्ज करार करण्यात आले आहेत.

२.	कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ०५.०८.२०२५ च्या शासन निर्णयान्वये १२५७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर १२५७ पदांपैकी १७२ नियमित पदे ही राज्यस्तर-प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई, विभागस्तर, जिल्हास्तर व उपविभाग स्तरावर निर्माण करण्यात आली आहेत. प्रकल्पाच्या मंजूर पुस्तिकांमध्ये क्षेत्रीय स्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी कार्यालये व विभाग प्रमूख यांनी करावयाचे प्रकल्पाचे कामकाज नमूद आहे.

३.	हवामान बदलास संवेदनशील गावांमध्ये कृषी उत्पादकता वाढविणे व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. प्रकल्प अमंलबजावणी आराखडा तसेच, प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यांच्या नियंत्रणाखाली आणि कृषि विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेद्वारे विभागीय स्तरावर विभागीय कृषी सह संचालक, जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा), उपविभागीय स्तरावर उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी आणि गावसमूह स्तरावर उप-कृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. क्षेत्रिय स्तरावर प्रकल्पाच्या कामकाजाची अंमलबजावणी करणे व प्रकल्पाच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे याकरीता त्या-त्या स्तरांवरील प्रकल्प अंमलबजावणी कक्षांचे प्रमुख विहीत करणे आवश्यक आहे.

४.	जागतिक बँकेच्या सहकार्याने सुरू असलेल्या या प्रकल्पाची प्रभावी व यशस्वी अंमलबजावणी करणे हे प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी क्षेत्रीय स्तरावरील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी प्रकल्पांतर्गत नमूद सर्व घटक, उपघटक व बाबींची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे. प्रकल्पाच्या टप्पा-२ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तसेच, मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्पांतर्गत विविध घटकांखालील उपघटक/बाबींच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावरील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) या जिल्हा स्तरावरील दोन्ही यंत्रणांमार्फत राबविण्यात येणार आहेत. त्यानुसार प्रकल्पांतर्गत घटकांखालील उपघटक/बाबींच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कामांच्या विषयांचा समावेश करणे आवश्यक आहे.

५.	कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ०९.०९.२०२० च्या शासन निर्णयानुसार अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ४९ (४) नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्राम कृषी विकास समितीची स्थापना करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. प्रकल्पाकरिता मंजूर केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी पुस्तिकेमध्ये ग्राम कृषी विकास समितीच्या कामकाजाची मार्गदर्शक तत्त्वे नमूद आहेत. त्यानुसार प्रकल्प गावांशी संबंधित ग्रामपंचायतींच्या ग्राम कृषी विकास समितीने प्रकल्पाकरिता कर्तव्य व जबाबदारी पार पडणे आवश्यक असून, प्रकल्पाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गर्शक सूचनांनुसार कामे करणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने दिनांक ०९.०९.२०२० च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या ग्राम कृषि विकास समितीच्या कार्यकक्षेमध्ये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ संबंधित कर्तव्य व जबाबदारी पार पडणे या बाबींचा समावेश करणे गरजेचे आहे.

६. वरील नमूद पार्श्वभूमीवर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करीता प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व त्या कक्षांचे प्रमुख विहीत करणे, प्रकल्पाच्या टप्पा-२ अंतर्गत घटकांखालील उपघटक/बाबींच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कामांच्या विषयांचा समावेश करणेबाबत तसेच, प्रकल्प अंमलबजावणीच्या अनुषंगाने ग्राम कृषि विकास समितीच्या कार्यकक्षेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय: -**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ च्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणी करण्याकरीता विविध स्तरांवरील प्रकल्पाच्या कामकाजाची अंमलबजावणी व प्रकल्पाच्या कामकाजाचे संनियंत्रण खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व त्या अंमलबजावणी कक्षांचे प्रमुख विहीत करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | स्तर | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष | प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे प्रमुख |
|---|---|---|---|
| १. | राज्य स्तर | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU- Project Management unit) | प्रकल्प संचालक |
| २. | विभाग स्तर (५ विभाग) | विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Divisional Project Implementation Unit) | विभागीय कृषी सह संचालक |
| ३. | जिल्हा स्तर (२१ जिल्हे) | जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (DPIU- District Project Implementation Unit) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | | अ) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय | |
| | | ब) प्रकल्प संचालक (आत्मा) कार्यालय | |
| ४. | उपविभाग स्तर (५५ उपविभाग) | उपविभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (SPIU- Subdivision Project Implementation Unit) | उपविभागीय कृषी अधिकारी |

२. प्रकल्पाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्याकरिता आणि निर्धारित वेळेत उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता, वरील स्तरावरील तसेच तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांनी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यांच्या नियंत्रणाखाली प्रकल्पाची अंमलबजावणी करावयाची आहे.

३. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत विविध घटकांखालील उपघटक/ बाबींच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावरील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) या जिल्हा स्तरावरील दोन्ही यंत्रणामार्फत राबवावयाचे विषय वाटप **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केले आहे.

(१) उक्त परिशिष्टात नमूद केलेल्या विषयांकरिता जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांनी प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कामांच्या मूल्यमापनाची नोंद त्यांच्या वार्षिक कार्य मूल्यमापन अहवालात (PAR) घ्यावी व त्यांच्या वरिष्ठांनी सदर कामांचे मूल्यमापन करुन प्रतिवेदन व पुनर्विलोकन करावे.

(२) प्रकल्पाचे सर्व घटक/उपघटक/बाबी यांची अंमलबजावणी करताना, त्या घटकासाठी प्रकल्पाकडून विहित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच जागतिक बँकेने मंजूर केलेले मॅन्युअल्स आणि अंमलबजावणी आराखड्यांमधील मार्गदर्शक तत्त्वे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(३) प्रकल्प संचालक यांना संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने विभाग प्रमुख या नात्याने प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारे घटक/उपघटक/बाबी यांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे व प्रकल्पाच्या गरजा लक्षात घेऊन मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करण्याचे अधिकार प्रकल्प संचालक यांना राहतील.

(४) क्षेत्रीय स्तरावरील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी, प्रकल्प संचालकांनी वेळोवेळी निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(५) प्रकल्पासाठी बाह्ययंत्रणेकडून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे प्रशासकीय व वित्तीय अधिकाराच्या बाबी सोपविण्यात येऊ नयेत.

४. कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ०९.०९.२०२० च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदीस अधीन ग्राम कृषी विकास समिती स्थापन करण्यात आलेल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरावर सदर ग्राम कृषि विकास समित्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ च्या कार्यन्वयासाठी कार्यरत राहतील. प्रकल्पाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नेमून देण्यात येतील, अशा अधिकारांचा वापर या समित्या करतील आणि प्रकल्पाशी संलग्न असलेली कर्तव्ये व इतर कामे पार पाडतील. तसेच, प्रकल्पाशी निगडीत बाबींकरिता ग्रामसभेस या समित्या उत्तरदायी असतील.

५. प्रकल्पाच्या अंमलबजावणी संदर्भात त्या-त्या स्तरावरील अधिकाऱ्यांनी कार्यालय प्रमुख तथा आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम करावयाचे आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२०३१५१३५००७०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE

Digitally signed by AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and ADF Department, 2.5.4.20=8EC4809BF7E642CE22FDACB42A63CA8410ADE167476AC90F3C879FACBF715A09, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=462D06A8B0C3DF3A0B3C93FE66F4D8A55913CE3FEBB0F6CDDF9D398D85D7377C, cn=AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
Date: 2026.02.03 15:14:54 +05'30'

**( अंबादास सा. चंदनशिवे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा.मंत्री (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

२. मा.राज्यमंत्री (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

५. अपर मुख्य सचिव (नियोजन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

६. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

७. सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे
१०. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई
११. विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)
१२. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)
१३. जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा (सर्व)
१४. उपविभागीय कृषी अधिकारी (सर्व)
१३. वित्त विभाग (व्यय-१/विसु-१), मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
१४. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१५. निवड नस्ती (कार्यासन-८अे)

# परिशिष्ट-अ

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारे घटक/उपघटक/बाबी

| घटक | उपघटक | | उपक्रम | जिल्हास्तरीय अंमलबजावणी अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अ. संसाधन कार्यक्षमता वाढवून उत्पादकता वृद्धी (A. Resource-Efficient Productivity Enhancement)** | | | | |
| | अ१. उत्पादन प्रणालींची कार्यक्षमता वाढविणे (A1. Promoting Production Systems Efficiency) | | | |
| | अ१.१ जमिनीची कार्यक्षमता वाढविणे (A1.1 Enhancing Soil/ Land Efficiency) | | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | अ.१.२. मृदा आरोग्य परीक्षण (A.1.2. Soil health assessment) | | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | अ.१.३. शेतबांधावर जैविक खत निर्मिती (A.1.3. On - farm production of biofertilizers) | | | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | अ.१.४ सेंद्रिय निविष्ठांचे उत्पादन (A.1.4 Production of organic inputs) | | | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | अ.१.५ संवर्धित शेती (A.1.5 Conservation agriculture) | | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | अ.१.६ खत वापर कार्यक्षमतेत सुधारणा (A.1.6 Enhancing FUE) | | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | अ२. पाण्याची उपलब्धता व कार्यक्षमता वाढविणे (A2. Enhancing Water Use Efficiency) | | | |
| | अ२.१ पाणलोट क्षेत्र उपचार (A2.1 Catchment Treatment) | | | |
| | | | क्षेत्र उपचार (Area treatment) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | | | ओघळी वरील उपचार (Drainage line treatment) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | | | पाणी साठवण संरचना (Water harvesting structures) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | | | भूजल पुनर्भरण (Recharging of Groundwater) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | | | जलसंधारण संरचना पुनरुजीवन (Rejuvenation of Water harvesting structures) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | अ२.२ पाण्याचा कार्यक्षम वापर करणे (A2.2 Reducing water-footprint through water use efficiency) | | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | | | सूक्ष्म सिंचन (Micro-Irrigation) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | अ३. हवामान अनुकूलतेसाठी तंत्रज्ञानाचा प्रसार<br>(A3. Technology Transformation for climate resilience) | |
| | अ.३.१ क्षेत्रीय पिकांसाठी हवामान अनुकूल तंत्रज्ञान प्रसार<br>(A.3.1 Climate Resilient Technologies for Field crops) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | अ.३.२ फळबाग पिकांसाठी हवामान अनुकूल तंत्रज्ञान प्रसार<br>(A.3.2 Climate Resilient Technologies for Fruit crops) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | अ.३.३ हवामान अनुकूल बियाण्यांचे संवर्धन व उत्पादन<br>(A.3.3 Conservation and multiplication of climate resilient seeds) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| **ब. काटेकोर शेतीस प्रोत्साहन**<br>**(B. Promoting Precision Agriculture )** | | |
| | ब१. भात उत्पादनासाठी संसाधन कार्यक्षमतेत सुधारणा<br>(B1. Improving Resourse Effeicency for Paddy Production) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | ब२. शेतीमध्ये पारंपारिक ऊर्जेचा वापर कमी करणे<br>(B2. Reduced Energy Consumption in Agriculture) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | ब२.१ अपारंपारिक ऊर्जा वापरास प्रोत्साहन<br>(B2.1 Promotion of alternate energy in agriculture) | |
| | ब३. जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढीसाठी बहुपीक पद्धतीस प्रोत्साहन (B3. Promoting Crop Diversification for Soil Organic Carbon ) | |
| | ब३.१ कृषी वनीकरण (B3.1 Agroforestry) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | ब३.२ बांबू लागवड (B3.2 Bamboo plantation) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | ब३.३ फळबाग लागवड (B3.3 Horticulture Plantation) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | ब३.४ संरक्षित शेती (B3.4 Protected cultivation) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | ब.३.५ भरडधान्य उत्पादनाला प्रोत्साहन देणे<br>(B.3.5 Enhancing millet production) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| **क. उत्पन्न वाढीचे स्त्रोत बळकटीकरण (C. Improving and Building and Income Resilience)** | | |
| | क १- कृषी मूल्य साखळ्यांचे बळकटीकरण<br>(C1-Strengthening Agribusiness Value Chains) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | क १.१ शेतकरी उत्पादक संस्थाना अर्थसहाय्य<br>(C1.1 FPOs as a vehicle of transformation) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | क२- कृषि व्यवसाय वृद्धी करिता सेवा केंद्रांची स्थापना<br>(C2 -Agribusiness Growth Centres) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | क ३- वैयक्तिक कृषी पूरक उद्योगास प्रोत्साहन देणे<br>(C3 -Promotion of agri-entrepreneurship (Individual)) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |

| ड. प्रकल्प व्यवस्थापन आणि संस्थात्मक बळकटीकरण<br>**(D. Project Management and Strengthening Institutions)** | | | |
|---|---|---|---|
| | ड ४- क्षमता बांधणी (D4 -Capacity Enhancement) | | |
| | | ड ४.२ प्रशिक्षण (D4.2 Training) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | | ड.४.३ कार्यशाळा /परिसंवाद /परिषद<br>(D.4.3 Workshops/Seminar/Conference) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | | ड.४.४ शेतकरी अभ्यास दौरे<br>(D.4.4 Exposure visits) | प्रकल्प संचालक, आत्मा |
| | ड ५- मनुष्यबळ व्यवस्थापन<br>(D5- Human Resource Management) | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| | लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन प्रक्रिया<br>(Participatory Micro-Planning Process) | | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |